hastkala Life

WOVEN BY CULTURE

30 YEARS

हस्तकला लाईफच्या पुढील
पुरवणीच्या मजकुरासाठी
संपर्क : रोहिणी कुलकर्णी 9819755919
ऐश्वर्या म्हैसकर - 91580 61923
साक्षी साबळे 93240 14616

VOLUME: 02 | ISSUE : 06 | MARCH 2026 | 8 PAGES

Managing Editor : Nikhil Ballal

Supported by ठाणेवैभव



Pravin CHHEDA

CHAIRMAN, HASTKALA

The Silent Sculptors: India's Weavers and the Soul of the Saree

When we drape a handloom saree, we aren't just wearing six yards of fabric; we are wearing a masterpiece of human endurance. Behind the vibrant hues of a Banarasi silk or the intricate geometry of a Pochampally Ikat lies the silent, rhythmic clacking of the loom—a sound that defines the lives of over 35 lakh weavers across India. These artisans are the true sculptors of our heritage, transforming humble threads into a masterpiece.

The journey of a single saree is a testament to boundless patience. Before the first thread is even tossed, weavers spend days preparing the loom, a process called warping and drafting that requires mathematical precision. A complex Kanjivaram or a double-ikat Patola can take anywhere from three weeks to several months to complete. During this time, the weaver sits in a cramped pit or before a wooden frame for 10 to 12 hours a day, maintaining a level of focus that borders on the meditative. One wrong move, one broken thread, and the symmetry of a lifetime's skill is compromised.

Their creativity is instinctive, passed down through generations like a sacred heirloom. Without formal design degrees, they "program" complex motifs—peacocks, temple towers, and mythical vines directly into the loom. They play with light and shadow, mixing zari and silk to create "dhup-chaon" (iridescence) that no machine can truly replicate.

Every saree is a collaborative triumph. From the dyers who boil the yarn in organic pigments to the designers who punch the jacquard cards and the weavers who throw the shuttle, a village of hands touches every fold. To buy a handloom saree is to offer a big salute to these resilient artists. It is an acknowledgement that in a world of fast fashion, the slow, soulful heartbeat of the handloom still reigns supreme.

हस्तकला साडी वॉकेथॉनला महिलांचा उदंड प्रतिसाद

८,००० हून अधिक महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



हस्तकलाचे प्रवीण छेडा यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या वॉकेथॉनचा उद्देश भारतीय कारागीर व विणकरांना पाठबळ देणे आणि साडी संस्कृतीचे जतन करणे हा आहे. २०२५ मध्ये पहिल्यांदा आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात सुमारे ३,२०० महिला सहभागी झाल्या होत्या, तर यंदा हा आकडा दुपटीहून अधिक वाढून ८,००० च्या पुढे गेला. या वॉकेथॉनमध्ये एक, तीन आणि पाच किलोमीटर अशा तीन प्रकारच्या वॉक स्पर्धांचा समावेश होता. महाराष्ट्रासह दक्षिण मुंबई, पश्चिम उपनगर, नवी मुंबई, पुणे, नाशिक आणि सुरत येथून महिलांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

महिला दिनानिमित्त 'हस्तकला'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या साडी वॉकेथॉनने यंदा नवा इतिहास रचला. भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक असलेल्या साडीचा गौरव आणि महिलांच्या स्वास्थ्याचा संदेश देणाऱ्या या अनोख्या उपक्रमात यंदा तब्बल ८,००० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवला. ठाण्यातील हिरानंदानी इस्टेट परिसरात सकाळी ६ ते ९ या वेळेत हा भव्य उपक्रम पार पडला.

विविध प्रांतांतील पारंपरिक साड्यांमध्ये सजलेल्या महिलांचा देखावा ठाण्याच्या रस्त्यांवर एकात्मता आणि सशक्ततेचा संदेश देणारा ठरला. विशेषतः नऊवारी साडीत सहभागी झालेल्या महिलांनी लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमात महिलांच्या सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी 'सर्वोत्तम पारंपरिक साडी लूक', 'सर्वात सर्जनशील साडी स्टायलिंग', 'सर्वोत्तम जोडी', 'सर्वोत्तम गट' आणि 'आकर्षक रंगसंगती' अशा विविध पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद मिळवली असून सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले.

| पान ४-५ वर

जिद्दीची शिखरे गाठणाऱ्या पोलीस अधिकारी द्वारका डोखे



वयाच्या पन्नाशीतही जिद्द, चिकाटी आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर जगातील सर्वोच्च शिखरे सर करणाऱ्या द्वारका भागीरथी विश्वनाथ डोखे या महाराष्ट्र पोलीस दलातील एक अभिमानास्पद व्यक्तिमत्त्व ठरल्या आहेत. सध्या ठाणे पोलीस आयुक्तालयातील ठाणे नगर पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक (प्रशासन) म्हणून त्या कार्यरत आहेत. द्वारका डोखे यांनी केवळ पोलीस सेवेतच नव्हे तर गिर्यारोहण क्षेत्रातही अभूतपूर्व कामगिरी करत महाराष्ट्राचे तसेच देशाचे नाव उंचावले आहे.

| पान ७ वर



द्वारका डोखे



त्यांचे पुढील ध्येय हिमालयातील उर्वरित अष्टहजारी शिखरे सर करण्याचे आहे. सन २०२६ मध्ये जागतिक क्रमवारीतील पाचव्या क्रमांकाचे माऊंट मकालु तसेच जागतिक क्रमवारीतील सातव्या क्रमांकाचे माऊंट धौलागिरी शिखरे सर करून त्या शिखरांवर ऑक्सिजन मास्कविना राष्ट्रगीत, महाराष्ट्र राज्य गीत तसेच १५० वर्ष पूर्ण झालेले "वंदे मातरम्" या राष्ट्रीय गीताचे गायन करण्याचा निर्धार असून या दोन्ही मोहिमांसाठी सुमारे ३३ ते ३५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. आर्थिक अडचणी असूनही त्यांची जिद्द तसेच दुर्दम्य इच्छाशक्ती अजिबात कमी झालेली नाही. "भारताचे तसेच महाराष्ट्राचे नाव जगाच्या नकाशावर उजळवायचे आहे" हे स्वप्न मनात बाळगून त्या अथक परिश्रम घेत आहेत.

When Fashion Becomes Passion and Timeless Elegance





Shiitaal Nikam's journey is a compelling story of determination, versatility, and the courage to follow one's true calling. With a strong academic foundation that includes a D.Ed, BA, LL.B, and a Diploma in Fashion Design, she initially began her professional career in the field of education, working as a teacher at Saraswati English Medium School in Airoli. She later explored the legal profession, practising law for nearly one and a half years. However, despite her success in these fields, her passion for fashion remained undeniable and eventually guided her toward a path where creativity met purpose.

Around 2011–2012, Shiitaal stepped into the world of fashion with a simple beginning, armed with her diploma and a deep desire to create. Within just a few years, her talent and dedication helped her establish a strong presence in Thane, where she became a recognised name in the fashion industry. Her keen eye for design and her ability to understand her clients' personalities allowed her to specialise in customised outfits. She further elevated her work by introducing intricate handwork and embroidery, which led her into the realm of bridal and luxury prêt fashion. Her designs quickly resonated with clients who appreciated individuality, elegance, and attention to detail.

Shiitaal's journey has been one of continuous growth and exploration. She actively participated in numerous fashion events, gaining recognition and appreciation for her work. Over time, her expertise and reputation earned her invitations as a guest and jury member at beauty pageants and fashion shows. She also collaborated with several brands, further expanding her reach and influence in the industry. Despite her achievements, Shiitaal has remained committed to evolving her craft, constantly learning from her experiences, clients, and the skilled artisans she works with.



Shiitaal Nikam

Today, Shiitaal Nikam represents more than just a fashion label; it embodies a philosophy tailored for the modern woman, one who values authenticity over trends and substance over superficiality. The brand celebrates women who are confident, intentional, and self-assured, offering designs that reflect their inner strength and individuality. Each creation is thoughtfully crafted, blending the richness of Indian artistry with contemporary elegance, ensuring that every garment is not just worn, but experienced.

At its core, the story of Shiitaal Nikam is intertwined with Shiitaal's own life, a journey marked by resilience, independence, and transformation. From balancing family, education, and career to embracing entrepreneurship, she has consistently turned challenges into opportunities. Her transition into fashion was not merely a career shift but a deeper pursuit of purpose and self-expression.

The brand, originally known as "Awesome by Shiitaal Nikam," was built on a powerful belief that every woman deserves to feel confident, beautiful, and truly "awesome" in what she wears. The name reflected not only the garments she created but also the emotion, confidence, and individuality each design was meant to evoke. As her journey progressed, the brand evolved into "Shiitaal Nikam," a name that carries a deeper, more personal identity and a refined design philosophy.

Through her work, Shiitaal Nikam continues to redefine fashion as a medium of empowerment. Her brand stands as a celebration of confidence, grace, and individuality created for women who know who they are, embrace their journey, and choose to express themselves unapologetically through what they wear.

टेरेस टू टेबल : जिद्दीने उभा केलेला खाद्यप्रवास





आजच्या डिजिटल युगात अनेकांनी आपल्या आवडीला व्यवसायात रूपांतरित करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यात सातत्य, गुणवत्ता आणि जिद्द यांचा संगम साधणारे फारच कमी असतात. अशाच प्रेरणादायी उद्योजिकांपैकी एक म्हणजे स्वप्नाली प्रधान. बीएमएस (बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज) पदवीधर असलेल्या स्वप्नाली यांनी आयुष्यातील कठीण प्रसंगाला संधीमध्ये बदलत एक यशस्वी खाद्य व्यवसाय उभा केला आहे.

२०२० मध्ये कोविड महामारीमुळे त्यांची इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी बंद पडली. अनेकांसाठी हा काळ निराशेचा ठरला असताना स्वप्नाली यांनी हार न मानता नव्या दिशेचा विचार केला. "टेरेस टू टेबल" या यूट्यूब चॅनलच्या माध्यमातून त्यांनी आपल्या प्रवासाची नव्याने सुरुवात केली. घरच्या टेरेसवर भाज्या पिकवणे आणि त्या ताज्या भाज्यांपासून स्वादिष्ट पदार्थ तयार करणे ही संकल्पना त्यांनी लोकांपर्यंत पोहोचवली. त्यांच्या व्हिडिओंमधील साधेपणा, प्रामाणिकपणा आणि उपयुक्तता यामुळे अल्पावधीतच त्यांना मोठा प्रतिसाद मिळू लागला.

चॅनल लोकप्रिय होत असताना त्यांच्या सबस्क्राइबर्सकडून घरगुती पदार्थ विकण्याची मागणी येऊ लागली. लोकांना त्यांच्या हातच्या चवीचा अनुभव घ्यायचा होता. या मागणीतूनच त्यांच्या अन्न व्यवसायाची सुरुवात झाली. सुरुवातीचे दिवस मात्र सोपे नव्हते. ऑर्डर्स मिळवणे, उत्पादनाची योजना करणे आणि वेळेत डिलिव्हरी करणे ही मोठी आव्हाने होती. मात्र, सोशल मीडियावर आधीच तयार झालेल्या प्रेक्षकवर्गामुळे त्यांना आधार मिळाला.

उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या महिलांसाठी त्या महत्त्वाचा सल्ला देतात, "लहान व्यवसायापासून सुरुवात करा, एकनिष्ठ ग्राहक तयार करा, सातत्याने सुधारणा करा आणि हळूहळू व्यवसाय वाढवा. अडचणी आल्या तरी हार मानू नका. प्रत्येक समस्येमध्येच त्याचे उत्तर दडलेले असते." प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम या दोन मूल्यांच्या बळावर कोणतीही व्यक्ती यशाच्या शिखरावर पोहोचू शकते, असा त्यांचा ठाम विश्वास आहे.

त्यांच्या व्यवसायातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे मोठ्या प्रमाणात उत्पादन आणि त्याची सुरक्षित डिलिव्हरी. विशेषतः चकलीसारखे कुरकुरीत पदार्थ कुरिअरद्वारे पाठवताना तुटण्याची समस्या वारंवार उद्भवत होती. अनेक प्रयोग आणि प्रयत्नांनंतर त्यांनी योग्य पॅकेजिंग पद्धती शोधून काढली. आज



स्वप्नाली प्रधान

त्यांच्या उत्पादनांची सुरक्षित आणि व्यवस्थित डिलिव्हरी हे त्यांच्या व्यवसायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य बनले आहे.

स्वप्नाली यांच्या खाद्य व्यवसायाची खरी ताकद म्हणजे, "घरगुती चव आणि गुणवत्ता". शेंगदाणा तेल, शुद्ध तूप यांसारख्या दर्जेदार कच्च्या मालाचा वापर करून आणि शक्यतो हाताने तयार केलेले पदार्थ ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यावर त्यांचा भर असतो. मोठ्या यंत्रसामग्रीचा वापर टाळून त्यांनी चव आणि पोत यामध्ये सातत्य राखले आहे. त्याचबरोबर प्रत्येक पदार्थासाठी अचूक मोजमाप आणि निश्चित रेसिपी ठेवल्यामुळे त्यांच्या उत्पादनांमध्ये एकसारखी चव टिकून राहते. त्यांच्या उत्पादनांमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रिझर्वेटिव्ह वापरले जात नाहीत, ही त्यांची आणखी एक मोठी जमेची बाजू आहे. ताजेपणा टिकवण्यासाठी त्यांनी सीलबंद पॅकेजिंगचा वापर केला आहे. त्यामुळे ग्राहकांना घरगुती, ताजे आणि सुरक्षित अन्नपदार्थ मिळतात.

ग्राहकवर्गाबद्दल बोलायचे झाले तर, कुटुंब हा त्यांच्या व्यवसायाचा मुख्य आधार आहे. कामाच्या धावपळीत वेळ नसलेले तरुण, तसेच स्वयंपाक करू न शकणारे ज्येष्ठ नागरिक हे त्यांच्या ग्राहकांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहेत. विशेषतः दिवाळीच्या काळात त्यांच्या फराळाच्या व्हिडिओंना मिळालेल्या प्रतिसादामुळे ऑर्डर्सचा अक्षरशः पाऊस पडतो. "भाजणीची चकली" हा त्यांचा सर्वाधिक लोकप्रिय पदार्थ असून त्यानंतर चिवडा आणि सीकेपी स्पेशल करंजी (कानवले) यांना ग्राहकांची विशेष पसंती मिळते.

त्यांच्या व्यवसायाने लवकरच देशाच्या सीमाही ओलांडल्या. पहिल्याच वर्षी त्यांना यूएसए आणि यूकेमधून ऑर्डर्स मिळाल्या. या अनुभवातून त्यांनी आंतरराष्ट्रीय शिपिंगचे तंत्र शिकले आणि पुढील वर्षी त्यांनी अधिकृतपणे आंतरराष्ट्रीय स्तरावर सेवा सुरू केली. आज त्यांच्या उत्पादनांना यूएसए, यूके, ऑस्ट्रेलिया, सिंगापूरसह अनेक देशांतून मागणी आहे. स्थानिक असो किंवा आंतरराष्ट्रीय ऑर्डर, गुणवत्ता आणि ग्राहक समाधान यामध्ये त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. या संपूर्ण प्रवासात वेळेचे व्यवस्थापन हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरला.

स्वप्नाली यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. आई-वडील उत्पादन, पॅकिंग आणि डिलिव्हरीमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन त्यांना खंबीर साथ देतात. हा कुटुंबाचा आधारच त्यांच्या यशाचा खरा पाया ठरला आहे.

स्वप्नाली प्रधान या विविध खाद्य स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणूनही उपस्थित असतात. लोकमत श्रावण सोहळा, मोदक स्पर्धा तसेच सीकेपी स्नेहदा महिला शाखेच्या अन्न स्पर्धांमध्ये त्यांनी परीक्षक म्हणून काम करून आपल्या अनुभवाचा लाभ इतरांना दिला आहे. भविष्यात विविध ठिकाणी ऑफलाईन स्टोअर्स सुरू करून आपल्या उत्पादनांचा विस्तार करण्याचे त्यांचे स्वप्न आहे. "उत्तम गुणवत्ता, चव आणि ग्राहकांचा विश्वास" या तत्त्वांवर उभा असलेला त्यांचा व्यवसाय निश्चितच पुढील काळात अधिक मोठ्या यशाकडे वाटचाल करणार आहे.

स्वप्नपूर्तीचा ध्यास घेणारी अष्टपैलू 'ऋजुता'

"करिअरमध्ये खंड पडू द्यायचा नाही आणि कोणत्याही परिस्थितीत खचून जायचे नाही," असे ठामपणे सांगणाऱ्या शिक्षणतज्ज्ञ, गायिका, निवेदिका आणि 'Eduteria Learning Resources Private Limited' च्या संस्थापक ऋजुता सुकळीकर- देशपांडे म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व. त्यांच्या याच जिद्दीमुळे आणि मेहनतीमुळे युरोपमधील 'टॉप ऑफ द वर्ल्ड २०२१' या आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेत त्यांना 'मिसेस वर्ल्ड सेकंड रनर अप' आणि सर्वांगसंपूर्ण स्त्रीला दिला जाणारा 'मिसेस लेडी टॉप ऑफ द वर्ल्ड' हा यथायोग्य बहुमान मिळाला.

मूळच्या वांद्रे येथील असलेल्या ऋजुता लहानपणापासूनच शिक्षण आणि कला या दोन्ही क्षेत्रांत अग्रेसर होत्या. विविध स्पर्धा, वक्तृत्व, नाट्य आणि आकाशवाणीच्या कार्यक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग असे. शारदा संगीत विद्यालय (वांद्रे) येथे पंडिता इंदिराबाई केळकर यांच्याकडे त्यांनी संगीताचे धडे गिरवले. शिक्षणातही त्यांनी आपला ठसा उमटवत बायोटेक्नॉलॉजीमध्ये विद्यापीठात द्वितीय क्रमांक पटकावला आणि 'JRD TATA' स्कॉलरशिपसह मास्टर्स पूर्ण केले. त्यांनी IIT मुंबई आणि BARC सारख्या नामांकित संस्थांमध्ये इंटर्नशिप केली. आपल्या या यशात आई-बाबा आणि दोन मोठ्या बहिणींचा भक्कम पाठिंबा आणि आईने घेतलेली विशेष मेहनत यांचा त्या आवर्जून उल्लेख करतात. पुढे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (TIFR) येथे त्यांची निवड झाली, जिथे त्यांनी ऑलिम्पियाडमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना बायोलॉजी विषयाचे मार्गदर्शन केले. TIFR येथे कार्यरत असताना, 'Indian Women Scientists' Association' (IWSA) तर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांच्या शोधनिबंधाला (Research Paper) 'Young Scientist Award' देऊन गौरविण्यात आले.

शिक्षणाची प्रचंड आवड असलेल्या ऋजुता यांचे म्हणणे आहे की, "शिक्षण हे एक असे माध्यम आहे जे तुम्हाला आयुष्यात खूप उंचीवर घेऊन जाऊ शकते." लग्नानंतर संसाराची जबाबदारी सांभाळतानाही त्यांनी आपली शैक्षणिक ओढ कायम ठेवली. दिल्ली येथे बदली झाल्यावर त्यांनी 'डिप्लोमा इन क्लिनिकल रिसर्च' पूर्ण केले. कला आणि शिक्षण वाया जाऊ द्यायचे नाही, या जिद्दीतून त्यांनी मुंबईतील नामांकित BTTC संस्थेतून बी.एड. पूर्ण केले, ज्यात त्या प्रथम आल्या. त्यावेळी प्रसिद्ध उद्योजक निरंजन हिरानंदानी यांच्या हस्ते त्यांना 'बेस्ट स्टुडंट ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मुलाच्या संगीत शिक्षणासोबतच ऋजुता यांनी स्वतःचेही गाण्याचे शिक्षण पुन्हा सुरू केले आणि इथूनच त्यांच्या करिअरला एक नवीन वळण मिळाले. 'पनाश' संस्थेतर्फे 'मिसेस एशिया' म्हणून निवड झाल्यानंतर, युरोपमधील लॅट्विया येथे ऑनलाइन पद्धतीने पार पडलेल्या 'टॉप ऑफ द वर्ल्ड २०२१' या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी १३ देशांच्या स्पर्धकांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. या स्पर्धेतील 'टॅलेंट राउंड'मध्ये ऋजुता यांनी सादर केलेला 'तराणा' हा शास्त्रीय गायन प्रकार ज्युरींकडून विशेष वाखाणला गेला. केवळ मनोरंजन न करता भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या या सादरीकरणामुळे त्यांचे विशेष कौतुक झाले. स्विम सुट राउंड, इव्हनिंग गाऊन राउंड, नॅशनल कॉस्ट्यूम आणि प्रश्नोत्तरे फेरीतही त्यांनी आपला ठसा उमटवत 'मिसेस वर्ल्ड सेकंड रनर अप' आणि 'मिसेस लेडी टॉप ऑफ द वर्ल्ड' हे दोन मानाचे किताब पटकावले. या आंतरराष्ट्रीय यशाबद्दल ठाण्याचे तत्कालीन महापौर नरेश म्हस्के आणि तत्कालीन बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या स्पर्धेसाठी त्यांना टीएसए पनाशच्या संचालिका वैष्णवी अग्निहोत्री यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

लहानपणापासून स्वतःची एक शैक्षणिक संस्था असावी, हे ऋजुता यांचे स्वप्न होते. हेच स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी लोकपुरम (ठाणे) येथे 'Eduteria Learning Resources Private Limited' ची स्थापना केली. एड्युटेरिया लर्निंग रिसोर्सेस या अकॅडमी अंतर्गत शैक्षणिक, कला आणि आरोग्य या तिन्हींचा



प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक आशिष पाटील यांची एड्युटेरिया अकॅडमीने आयोजित केलेली कार्यशाळा



आदरणीय बाळासाहेब ठाकरेंच्या उपस्थितीत रंगलेला 'शारदा संगीत' चा अविस्मरणीय सोहळा





प्रतिष्ठित 'काला घोडा कला महोत्सवात' (Kala Ghoda Arts Festival) सूत्रसंचालनाचा मान



ऋजुता सुकळीकर- देशपांडे



जागतिक महिला दिनानिमित्त 'स्वरोन् स्टुडिओ' (Swaron Studio) तर्फे 'वुमन अचिव्हर अवॉर्ड'ने (Woman Achiever Award) सन्मानित

लग्नानंतर पती आणि मुलाचा भक्कम पाठिंबा लाभल्याने, ऋजुता आज आपल्या क्षेत्रात यशस्वीरित्या कार्यरत आहेत. त्यांच्या मते, स्त्रीचे आयुष्य आव्हानात्मक असते आणि वयाच्या प्रत्येक टप्प्यावर तिला अनेक बदलांना सामोरे जावे लागते. स्वतः पूर्णवेळ गृहिणी, पूर्णवेळ नोकरी आणि या दोन्ही भूमिका एकाच वेळी पार पाडल्यामुळे ऋजुता आपल्या अनुभवातून सांगतात की, "स्त्री कोणत्याही भूमिकेत असो, केवळ त्यावरून तिच्या बुद्धिमत्तेचे किंवा कर्तृत्वाचे मोजमाप करू नये." आयुष्यातील आव्हानात्मक टप्प्यांवर एकमेकींना समजून घेत, "मी तुझ्या पाठीशी आहे" हा मदतीचा हात प्रत्येक स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला दिला पाहिजे; कारण एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीची खरी आधारस्तंभ ठरू शकते, यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. त्याचबरोबर, मुळातच सरस असलेल्या स्त्रियांनी स्वतःला सिद्ध करताना पुरुषांशी तुलना करण्याऐवजी, निसर्गाने दिलेले स्त्रीत्व, त्यातील हळवेपण आणि भावना अभिमानाने मिरवल्या पाहिजेत, असा मोलाचा संदेश त्या देतात.

शिक्षणाद्वारे संगम साधण्याचा ऋजुता यांचा प्रयत्न आहे. त्याकरिता या वेगवेगळ्या प्रकारांमध्ये रेग्युलर क्लासेस, कार्यशाळा, कार्यक्रम, स्पर्धा अशा वेगवेगळ्या स्वरूपात ज्ञानार्जन तसेच मनोरंजन साधले जाते. शैक्षणिक अंतर्गत विविध शालेय आणि महाविद्यालयीन विषयांचे क्लासेस, कला अंतर्गत गायन, वादन, नृत्य तसेच इतर कला प्रकारांचे क्लासेस व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक व महाराष्ट्राचे लाडके लावणी किंग आशिष पाटील यांच्या एड्युटेरियाने आयोजित केलेल्या कार्यशाळेस भरभरून प्रतिसाद मिळाला होता. विरंगुळा म्हणून संगीत आणि पारंपरिक शास्त्रशुद्ध संगीत यातील फरक मुलांना समजावा आणि आपल्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे 'अस्सल' संगीत सोपवले जावे, हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्या काम करत आहेत.

'ब्रह्मांड कट्टा' या संस्थेच्या माध्यमातून, कट्ट्याचे संस्थापक राजेश जाधव यांच्या मार्गदर्शनांतर्गत त्यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठे योगदान दिले असून, सध्या त्या तिथे 'जनसंपर्क अधिकारी' (PRO) म्हणून कार्यरत आहेत. व्यावसायिक स्तरावर त्यांनी 'काला घोडा आर्ट्स फेस्टिवल' आणि 'उपवन आर्ट्स फेस्टिवल' यांसारख्या मानाच्या व्यासपीठांवर सूत्रसंचालन आणि निवेदन केले आहे.

ऋजुता यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान पाहून, भारतीय जनता पार्टी, ठाणे शहर अंतर्गत 'एक भारत श्रेष्ठ भारत' अभियान प्रकोष्ठाच्या सहसंयोजिका म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. या पदावर कार्यरत असताना, विविध राज्यांच्या स्थापना दिनानिमित्त अनेक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी संयोजक राजेश जाधव यांच्या सहकार्याने केले. या उपक्रमांना आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे (आमदार, पदवीधर मतदारसंघ व तत्कालीन अध्यक्ष) आणि अध्यक्ष संजय वाघुले यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या अभियानामार्फत विविध प्रांतांतील लोकांना एकत्र आणण्याचे भाजपाचे ध्येय यशस्वीपणे साध्य करण्यात आले. आता ऋजुता यांची भाजपा ठाणे शहर अध्यक्ष संदीप लेले यांच्या मार्गदर्शनाखाली, शहराच्या सांस्कृतिक प्रकोष्ठात नियुक्ती झाली आहे.





हस्तकला साडी वॉकेथॉनला महिलांचा उदंड प्रतिसाद

८,००० हून अधिक महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

दोन स्वतंत्र साक्षीदार, ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे अधिकृत वेळनियंत्रक आणि संपूर्ण कार्यक्रमाचे लाईव्ह चित्रीकरण यामुळे हा विक्रम अधिकृतरीत्या नोंदवण्यात आला. विशेष म्हणजे, टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये यापूर्वी विक्रम प्रस्थापित करणारे डॉ. चिरेश संघवी यांनीही या वॉकेथॉनमध्ये सहभाग घेत महिलांमध्ये सकारात्मकता आणि उत्साह निर्माण केला. कार्यक्रमाला ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर, पीएनजी ज्वेलर्सचे गोपाल सिंग, टिप टॉप प्लाझाचे जयदीप शाह आणि ठाणेवैभवचे व्यवस्थापकीय संपादक निखिल बल्लाळ यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी पीएनजी ज्वेलर्स, टिप टॉप प्लाझा, ठाणेवैभव, ज्युपिटर हॉस्पिटल, मुक्ता वेलनेस आणि एनरिच या प्रायोजकांचे सहकार्य लाभले. महिलांच्या सामर्थ्याचा, सौंदर्याचा आणि कर्तृत्वाचा गौरव करणाऱ्या या साडी वॉकेथॉनने केवळ हजारो महिलांना एकत्र आणले नाही, तर ठाण्याचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल करत एक नवा जागतिक विक्रमही प्रस्थापित केला.




















































IF SOMEONE SAID
YOU HAVE ENOUGH
SAREES
WALK AWAY FROM
THEM
YOU DO NOT NEED
SUCH NEGATIVITY
IN UR LIFE









Crowned by Courage: A Journey from Dreams to Empowerment



In a world where glamour often takes centre stage, Netraa Prasad Deosthalee stands out as a powerful example of resilience, vision, and determination. A proud Thanekar, born and brought up in Thane, she has not only carved a niche for herself in the world of beauty pageants but has also created a platform that empowers countless individuals to chase their dreams.

Netraa's journey is not just about crowns and titles; it is about courage, persistence, and purpose. A multiple beauty pageant titleholder herself, she transformed her passion into a meaningful venture by founding ND Events in 2024. Her vision was clear: to create opportunities for aspiring models, nurture talent, and build confidence among participants from all walks of life.



Her first major step into the industry came with the ambitious event Queen of Thane 2025. While the event witnessed an overwhelming response in terms of participation, the journey behind the scenes was far from easy. Finding sponsors and channel partners proved to be a constant challenge, demanding relentless efforts, numerous meetings, and unwavering belief in her dream. During this crucial phase, the support from Thane Vaibhav played a significant role in giving her platform the recognition it deserved.

Despite the successful execution of the event, Netraa faced a financial loss. For many, this setback could have marked the end of their journey, but not for her. Instead of stepping back, she chose to rise stronger. Her determination paid off when, within just four months, she successfully organised her second event. Though financially balanced, it symbolised something far more valuable: growth, confidence, and stability. It was a testament to her belief that persistence always leads to progress. With each step forward, ND Events began to establish itself as a promising name in the pageantry and event management industry. Under her leadership, the platform has successfully organised notable events such as Thane Super Models 2025, further strengthening its reputation for professionalism and inclusivity.

Today, Netraa is gearing up for her most ambitious project so far, Queen and King of Maharashtra 2026. What makes this event truly special is the introduction of a specially-abled category, a first-of-its-kind initiative in Thane. Through this, she aims to promote inclusivity and provide equal opportunities, ensuring that talent and confidence are celebrated beyond conventional boundaries.

Beyond the glamour of pageants, Netraa is deeply committed to social impact. She has worked closely with organisations like the Anni Foundation Rehabilitation Centre in Thane, where she trained young girls to build confidence and essential life skills. She has also extended her support to students and alumni of Aatman School for special children, guiding them to step forward with self-belief and dignity.



Netraa Deosthalee


Behind her remarkable journey lies a strong support system: her family, close friends, and her dedicated team. Their constant encouragement and belief have been her backbone during the most challenging phases, enabling her to move forward with strength and clarity.

Netraa's journey is a true reflection of passion meeting purpose. From winning crowns to creating platforms for others to shine, she continues to inspire and uplift. Her story reminds us that success is not defined by the absence of failure, but by the courage to rise after every fall.

As she beautifully puts it, "The crown I built was not given to me, it was earned through sleepless nights, silent struggles, and the courage to never give up."








Pearl Jamshedwala: A Voice for the Voiceless

For Pearl Jamshedwala, compassion was never a choice; it was instinct. Sixteen years ago, as a young child, she found herself unable to ignore the suffering of animals around her. Whether it was a limping dog, an injured bird, or a frightened creature hiding in a corner, she would always stop to help. What began as a simple act of kindness soon evolved into a lifelong mission dedicated to rescuing and rehabilitating animals in need.

Today, Pearl's life revolves entirely around caring for animals that are often overlooked or abandoned. Her work extends beyond common pets to include specially-abled cats, injured birds, and even lesser-acknowledged creatures such as rats, shrews, tortoises, and iguanas. For her, compassion knows no boundaries. She does not believe in categorising animals by breed or species. Instead, she identifies them by one shared identity: rescued and deserving of love.

However, this journey is far from easy. Behind every successful rescue story lies an untold struggle of sleepless nights, emergency veterinary visits, and the emotional and physical responsibility of caring for animals who depend entirely on her. Many of these animals arrive in critical condition, requiring constant medical attention, patience, and time to heal. Despite these challenges, Pearl continues her work with unwavering dedication.



A strong pillar behind her journey has been her family. Their unconditional support has helped her stay focused and fearless in her mission. While others may see dirt, wounds, or inconvenience, her family sees the compassion and purpose in her work. Their encouragement has given her the strength to continue without hesitation or fear of judgment.

Finding safe and loving homes for rescued animals is another crucial part of her work. Pearl goes to great lengths, travelling across the city whenever necessary to ensure each animal finds a responsible and caring family. For her, adoption is not just about placement; it is about guaranteeing that an animal, once abandoned or hurt, never has to face suffering again.

To sustain her rescue efforts, Pearl runs a small home-based pet boarding service from her mother's home. The modest income generated from this service goes directly into funding the medical care, food, and daily needs of the rescued animals. Her days often begin before sunrise, filled with feeding routines, administering medicines, injections, and tending to animals that would not survive without her care.

Though her work may not always bring recognition or accolades, it offers something far more profound: the silent trust of an animal who has learned to believe again. Each life she saves stands as a testament to the power of compassion and dedication.

Through her journey, Pearl continues to inspire others to look beyond indifference and choose kindness. In a world where countless animals are forgotten, her efforts remind us that even the smallest act of care can mean the difference between survival and silence.

For those in need of help for injured or abandoned animals, you can reach out to Pearl Jamshedwala- @pearljamshedwala

UPI ID: pjamshedwala@okicici

जिद्दीची शिखरे गाठणाऱ्या पोलीस अधिकारी द्वारका डोखे

(पान १ वरून)

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात जन्मलेल्या व सध्या श्रीरामपूर येथे वास्तव्यास असलेल्या द्वारका डोखे यांनी बी.एस्सी.(इलेक्ट्रॉनिक्स) आणि बी.एड. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. २००५ मध्ये पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन २००६ मध्ये नाशिक येथील महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षण घेत त्यांनी सेवेला सुरुवात केली. गेल्या १९ वर्षांत त्यांनी पोलीस दलात जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावत उल्लेखनीय कार्य केले आहे.

अपघाताने आयुष्यात आलेले गिर्यारोहण हा त्यांचा सद्यस्थितीचा आवडता छंद असून मागील १० वर्षांत त्यांनी सह्याद्रीतील अनेक किल्ले आणि डोंगर सर केले. या प्रवासातूनच त्यांच्या आयुष्यातील मोठ्या ध्येयांची सुरुवात झाली. २०१६ मध्ये हिमाचल प्रदेशातील चंद्रखानी, २०१७ मध्ये उत्तराखंडमधील रुपकुंड आणि २०२३ मध्ये लेह-लडाखमधील माऊंट नुन (कॅम्प २ पर्यंत) ही शिखरे त्यांनी यशस्वीरित्या सर केली. २०१८ मध्ये नेपाळमधील २१,२२७ फूट उंच "मेरा पीक" सर करणाऱ्या त्या महाराष्ट्र पोलीस दलातील पहिल्या सदस्य ठरल्या. त्यानंतर त्यांनी लभुचे पीक, आयलंड पीक आणि आमा दाबलम कॅम्प १ यांसारखी कठीण शिखरेही गाठली. त्यांच्या आयुष्यातील सुवर्णक्षण ठरला तो २२ मे २०२४, जेव्हा त्यांनी वयाच्या ५० व्या वर्षी जगातील सर्वोच्च माऊंट एव्हरेस्ट शिखर सर केले. पहाटे ४.१० वाजता शिखरावर पोहोचत त्यांनी भारताचा तिरंगा आणि महाराष्ट्र पोलीस दलाचा ध्वज अभिमानाने फडकावला. विशेष म्हणजे -४५ ते -५० अंश सेल्सिअस तापमानात आणि अत्यल्प ऑक्सिजनमध्ये त्यांनी ऑक्सिजन मास्क शिवाय भारताच्या राष्ट्रगीताचे गायन करून एक अद्वितीय विक्रम प्रस्थापित केला. अशी कामगिरी करणाऱ्या त्या महाराष्ट्रातील पहिल्या गिर्यारोहक, भारतातील पहिल्या महिला गिर्यारोहक आणि पोलीस दलातील पहिल्या सदस्य ठरल्या. दिवंगत आई-वडिलांना जगाच्या सर्वोच्च शिखरावरून जगावेगळी श्रद्धांजली अर्पण करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन सुरू झालेल्या या मोहिमेदरम्यान त्यांनी आपल्या आई-वडिलांसह शिक्षण क्षेत्रातील आई-वडील महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनाही चित्ररूपात श्रद्धांजली अर्पण केली.

एव्हरेस्टनंतरही त्यांची जिद्द कमी झाली नाही. सन २०२५ मध्ये त्यांनी जगातील चौथ्या क्रमांकाचे माऊंट ल्होत्से शिखर सर करण्याचे ध्येय निश्चित केले. पहिल्या प्रयत्नात ८४०० मीटर उंचीपर्यंत पोहोचूनही प्रतिकूल हवामानामुळे माघार घ्यावी लागली, मात्र दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर त्यांनी पुन्हा प्रयत्न करत २३ मे २०२५ रोजी सकाळी ७.२५ वाजता माऊंट ल्होत्से हे शिखर सर केले. या शिखरावर पाऊल ठेवणाऱ्या त्या महाराष्ट्र पोलीस



दलातील पहिल्या सदस्य आहेत. या शिखरावरही त्यांनी राष्ट्रगीताचे गायन करत तिरंगा आणि पोलीस दलाचा ध्वज फडकावला. साता समुद्रापार पोहोचलेला साईनामाचा गजर या शिखराच्या रूपाने सर्वप्रथम हिमालयात करून शिर्डी संस्थानकडून प्राप्त झालेले साई नाथांची प्रतिमा असलेले वस्त्र झळकवले. यानंतर सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांनी जगातील आठव्या क्रमांकाचे माऊंट मनास्लु शिखर सर करण्याचा निर्धार केला. २४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास त्यांनी हे शिखरही यशस्वीरित्या सर केले. यावेळी त्यांनी लालबागच्या राजाचे तसेच आदिशक्तीचे चित्र तसेच साईनाथांची प्रतिमा असलेले वस्त्र झळकावून गणरायाच्या तसेच दुर्गा मातेच्या महामंत्राचे उच्चारण करून साईनामाचा गजर केला. या शिखरावरूनही आई-वडिलांना चित्ररूपात श्रद्धांजली अर्पण करत त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज, स्वामी विवेकानंद, नेताजी सुभाषचंद्र बोस या महापुरुषांना तसेच डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम, डॉ. सॅम्युअल हानेमान, रतन टाटा या महान व्यक्तींना चित्ररुपात अभिवादन केले. विशेष म्हणजे मनास्लु शिखरावर त्यांनी ऑक्सिजन मास्कशिवाय राष्ट्रगीतासह "जय जय महाराष्ट्र माझा" हे राज्यगीत गाऊन इतिहास रचला. हिमालयात महाराष्ट्राचे राज्यगीत पोहोचवणाऱ्या त्या पहिल्याच गिर्यारोहक ठरल्या. प्रत्येक मोहिमेत त्यांनी भारताचा तिरंगा आणि महाराष्ट्र पोलीस दलाचा ध्वज अभिमानाने फडकावत देशाचा गौरव वाढवला आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे केवळ पोलीस दलाचाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचा अभिमान उंचावला आहे.

वय, परिस्थिती आणि अडचणींवर मात करून स्वप्नांच्या शिखरावर पोहोचता येते हे द्वारका डोखे यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. त्यांची कहाणी ही केवळ यशाची नाही तर धैर्य, देशप्रेम, अटळ जिद्द आणि दुर्दम्य इच्छाशक्तीची जिवंत साक्ष आहे.

Transforming Lives Through a Legacy in Leadership

For some, teaching is a profession; for others, it is a legacy. When educational leadership is in your blood, you do not just lead—you transform lives. This defines Dr Anjali Pandey, Principal of BSM Dnyananand School in Thane. Her choice was destined, rooted in a family devoted to education and nation-building.

This profound legacy was shaped by her grandmother, a National Award–winning teacher and principal from Uttar Pradesh, who dedicated 47 years to education with a flawless 100% result record and a commitment to women's empowerment across academics, NCC, and PT drills. Witnessing her grandmother's passion, discipline, and ability to bring meaningful change inspired Dr Anjali deeply, shaping her purpose and guiding her path. This foundation was strengthened by her grandfather, a freedom fighter and successful principal, and her father, a renowned retired professor from Varanasi. With an aunt who is also a National Award–winning principal, Dr Anjali views education as a way of life. Today, under the noble guidance of Mr Kedar Joshi, Secretary of Brahman Shikshan Mandal, she continues this mission, crediting the institution's supportive leadership for providing the platform to drive change.

Ultimately, Dr Anjali's goal is to foster a dynamic, student-centric ecosystem focused on academic excellence and personality enhancement. By strengthening industry connections and introducing innovative teaching methodologies, she prepares every graduate to emerge as a confident, ethical professional ready to face global challenges. Under her leadership, BSM continues to be a place where legacy meets the future, shaping the next generation of leaders.

Dr Anjali's dedication has earned her numerous prestigious accolades, including the 'Maharashtra Ratna Puraskar 2026' for outstanding state leadership and the 'National School Award' for being a Best Visionary Principal. Recognised globally as a 'Skill Bharat Ambassador' through the SKILL Bharat Samman 5.0, she has also been featured among 'India's Most Influential Women Educators'. Her consistent excellence is further marked by the 'Best Educator Award 2025' and the 'Shikshak Ratna Puraskar 2025', honouring her student-centric initiatives and exemplary service to the teaching profession.



Dr Anjali Pandey, receiving the prestigious Maharashtra Gaurav Puraskar for her excellence in education



Dr Anjali Pandey

Her academic journey is deeply rooted in a commitment to institutional development. Holding a Doctorate, she has consistently worked toward enhancing both subject expertise and administrative leadership. For her, education was never just a career choice but a calling to shape society. Having started in the classroom to understand student aspirations firsthand, she transitioned into leadership to design better systems. Today, her focus remains on creating a balanced environment where discipline, innovation, and growth coexist seamlessly.


At the heart of her methodology is a unique blend of traditional values and modern professional demands. While BSM maintains a strong foundation of ethics, Dr Anjali ensures the curriculum remains industry-ready. She achieves this by preserving core values like integrity and respect while integrating modern practices such as digital learning and case-based teaching. This dual focus ensures that graduates are not only knowledgeable but also responsible, future-ready professionals. In a rapidly changing landscape, she believes that 'adaptability' is the most essential skill for any student. Knowledge alone is no longer enough; success belongs to those who can learn, unlearn, and relearn. By combining this adaptability with strong communication and a problem-solving mindset, she empowers her students to thrive in any professional environment they choose to enter.

Dr Anjali's vision extends far beyond textbooks, as she actively promotes real-world exposure through internships, industry visits, and guest lectures. By encouraging students to engage directly with business environments, she ensures they understand the practical application of theoretical concepts. This experiential learning builds the confidence necessary to transition smoothly from the classroom to the boardroom.

Simply Relish with Heart in Every Bite



Alpenlibe Just Jelly's Bakers Studio Winner for Season 2



Rucha with Mother Prajakti Rao



In every creation, Prajakti and Rucha pour their hearts and souls. They believe that when a client invites them to be a part of their celebrations, they owe it to them to give 110%, turning every bite into a celebration of flavour, wellbeing, and trust.

Simply Relish is the inspiring journey of mother-daughter duo Prajakti and Rucha Rao, who transformed a simple summer baking course into a flourishing home bakery. Their commitment to excellence has earned them consistent rankings among Mumbai's top 10 and India's top 25 home bakers by various Bakery awards, such as Jindal Cocoa, Homebakers Guild, and Seabuzz Master Baker. Most notably, they emerged as the winners of the Alpenliebe Just Jelly Baker's Studio Season 2 on Zee TV.

The venture began when Rucha, a nutritionist, enrolled in a bread-baking course. A shared passion soon emerged; whenever Rucha faced academic deadlines or exams, Prajakti stepped in to attend the classes in her place. This unexpected introduction sparked Prajakti's own love for the craft. By 2015, while balancing a professional career and home life, she began taking her first orders.

A defining moment arrived in 2016 when Prajakti's application for an international baking diploma in Bengaluru was initially rejected due to the age criteria. Refusing to let a number define her potential, the family flew to Bangalore to meet the institute's owner in person. Impressed by her determination, he granted her admission. Together, mother and daughter went on to complete the Diplôme de Pâtisserie at the esteemed Lavonne Academy of Baking Science and Pastry Arts.

Upon Rucha's graduation in 2017, she took the helm of full-fledged production, ranging from delicate cupcakes to intricate customised cakes, while Prajakti led client communications and social media marketing- all on her own! Their USP lies in an uncompromising approach: they use only fresh, hygienic ingredients with strictly no premixes or additives. This dedication to quality was famously tested when they handcrafted 60 unique customised cakes in just 72 hours for Minister of Transport Pratap Sarnaik's birthday.

Their growth has been entirely organic, fuelled by word-of-mouth. To deepen her industry expertise, Rucha even worked in Quality Control for a brand supplying major chains like Café Coffee Day. Today, she continues to expand her professional horizons as an active member of the Saturday Club Global Trust, a prominent Marathi business networking forum.

Beyond the oven, Rucha is passionate about sharing her expertise, frequently conducting baking workshops to inspire and train aspiring bakers. As a nutritionist, Rucha is dedicated to balancing indulgence with health. Their Nachni (ragi) dates cake and brown-sugar banana bread are fan favourites, crafted to retain natural nutrition. She is currently researching millet-based cookies and tarts, driven by a desire to prove that mindful eating can be truly delicious.